# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ६८–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सोमाण्णा अनाप्पा जडीवेर,<br>मु.पो. भिवर्गी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सोमाण्णा अनाप्पा जडीवेर, मु.पो. भिवर्गी,ता. जत, जि. सांगली यांनी नवीन वीज कनेक्शन मिळणेसाठी वि.प.कडे दि. १८.१.२०१० ला अर्ज केला. त्यानंतर दि. २२.१.२०१० रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार नोंदविली. तक्रारदाराने या तक्रारीत मुदतीत चलन (कोटेशन) व वीज कनेक्शन मिळून विलंबासाठी भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे. प्रस्तुतची तक्रार मंचाकडे दि. १२.३.२०१० रोजी प्राप्त झाली.

वि.प.ने आपल्या दि. २९.४.२०१० चा लेखी अहवालात तक्रारदाराचा ए १ फॉर्म दि. १८.१.२०१० मिळाल्याचे मान्य केले व त्यांस दि. ८.४.२०१० रोजी चलन दिले. ग्राहकाचा टेस्ट रिपोर्ट दि. २१.४.२०१० ला प्राप्त झाला व त्याचदिवशी कनेक्शन दिले. प्रस्तुतची तक्रार मंचासमोर आज रोजी दि. ४.५.२०१० रोजी सुनावणीस घेतली असता, तक्रारदार गैरहजर वि.प.तर्फे श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. मैंलापूरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग हजर. वि.प.तर्फे विलंबासाठी कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही, परंतु तक्रारदाराने टेस्ट रिपोर्ट दिल्यानंतर त्याचदिवशी कनेक्शन दिले आहे म्हणून भरपाई माफ करावी अशी तोंडी विनंती केली. त्या पृष्ट्यर्थ, तक्रारदार यांनी मंचाला अग्रेषित केलेला अर्ज श्री. मैंलापुरे यांनी सादर केला. त्यामध्ये वि.प.कडून नुकसान भरपाई नको, कनेक्शन मिळाले आहे असे नमूद केले आहे. त्या अर्जावर तक्रारदाराचे निशाणी अंगठा आहे परंतु पत्रावर तारीख नाही. असे असले तरी, टेस्ट रिपोर्ट दिल्यानंतर पैंसे भरताच त्याचदिवशी कनेक्शन दिले आहे, त्यामुळे तक्रारदाराची एक विनंती वीज कनेक्शन मिळावे ही पूर्ण झाली आहे. तक्रारदाराची विलंबापोटी नुकसान भरपाई मिळावी ही दुसरी मागणी आहे. दिनांक १८.२.२०१० ते ८.४.२०१० या विलंबाच्या कालावधीसाठी भरपाई देणेस वि.प. जबाबदार आहे व तक्रारदार ती मिळणेस हक्कदार आहे. वि.प.तर्फे विलंबाबाबत खुलासा केलेला नाही, परंतु तक्रारदाराचा श्री. मैंलापूरे यांनी हजर केलेल्या अर्जात तक्रारदार यांनी नुकसान भरपाई नको असे नमूद केले आहे, पर्यायाने भरपाईचा हक्क सोडून दिलेला आहे असे म्हणावे लागेल. त्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल.

## आदेश

१) तक्रारदार यांस वितरण कंपनीने वीज कनेक्शन दिले आहे. दि. १८.२.२०१० ते ८.४.२०१० या विलंबाच्या कालावधीच्या भरपाईसाठी तक्रारदाराने हक्क सोडून दिला आहे त्यामुळे तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ४.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :